GANPATRAO ADKE INSTITUTE OF NURSING
SMMPP'S
NASHIK
F-2900
NASHIK

CON 483

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION, MUMBAI

REGULAR / IRREGULAR BATCH

SUPPLEMENTARY EXAMINATION IN AUXILIARY NURSING AND MIDWIFERY
FIRST YEAR

PRIMARY HEALTH CARE NURSING—PAPER III

THURSDAY, 6TH MARCH 2025

[TIME : 1-00 P.M. TO 4-00 P.M.]

(TOTAL MARKS—75)

***Instructions* :—**

1. Candidate must write her / his seat number in **ENGLISH.**
2. Please note that the question paper set in **ENGLISH** version is final for any doubt in **MARATHI** paper.
3. Write New question on **NEW** page.

Marks

1. (*a*) Select the most appropriate answer from the following :— (05)

(*i*) Bluish Discolouration of skin is called as ..... .

(*a*) Cyanosis (*b*) Jaundice
(*c*) Peteche (*d*) Oedema.

(*ii*) Operated wound is ..... type of wound.

(*a*) Abrasion (*b*) Crushed
(*c*) Incised (*d*) Stabbed.

(*iii*) Nitroglycerin tablet is given for ..... as an emergency treatment.

(*a*) Stroke (*b*) Heart Attack
(*c*) Kidney Stones (*d*) Diabetes.

(*iv*) ..... position should be given to patient with asthma.

(*a*) Supine (*b*) Prone
(*c*) Fowler (*d*) Lithotomy.

(*v*) Abnormal and Immature production of RBC's is called ..... .

(*a*) Anaemia (*b*) Leukaemia
(*c*) Leucopenia (*d*) Thrombocytopenia.

(*b*) Match the following :— (05)

	'A' Group		'B' Group
(*i*)	Calcium Oxalate	(*a*)	Insulin
(*ii*)	Diabetes	(*b*)	Hydrotherapy
(*iii*)	High Grade Fever	(*c*)	Goitre
(*iv*)	P.R.N.	(*d*)	Kidney Stone
(*v*)	Iodized Salt	(*e*)	If necessary.

[*Turn over*

Marks

(c) State ***true*** or ***false*** :— (05)

(i) Antidote is a substance used to counteract the effect of poison.

(ii) BCG Vaccine is given to prevent Malaria in children.

(iii) Bile helps for digestion of Fat.

(iv) Neurone is the functional unit of kidney.

(v) Epistaxis is bleeding from nose.

2. Define the following :— (10)

(a) First Aid (b) Epidemiology

(c) Wound (d) Referral System

(e) Suffocation.

3. Write short notes on (any ***four***) :— (20)

(a) Rules of drug administration

(b) Levels of prevention

(c) Cold Chain

(d) First aid for Foreign Body in ear

(e) Causes of Hypertension and care.

4. Mr. Vyas 56 years old male admitted in the hospital with the known case of Diabetes Mellitus. He is on Injection Insulin. **(15)**

Answer the following questions :—

(a) Define Diabetes Mellitus. (02)

(b) Write signs and symptoms of Diabetes Mellitus. (04)

(c) Write Dietary plan for Mr. Vyas for Diabetes Mellitus. (04)

(d) What health education will you give to Mr. Vyas regarding care at home? (05)

OR

60 years old male Mr. Radhe admitted in hospital with the complaints of constipation and bleeding piles after every 3-4 days. **(15)**

Answer the following questions :—

(a) What is piles ? (02)

(b) What are the causes of piles ? (03)

(c) Write the investigation to be carried out in case of piles. (03)

(d) Write the Medical and Surgical Management of piles. (03)

(e) Explain the role of Nurse in care of Mr. Radhe. (04)

5. Answer the following questions :— **(15)**

(a) Define communicable disease. (02)

(b) How will you prevent cross infection ? (04)

(c) What are the causes of epidemic ? (04)

(d) Write the role of A.N.M. in epidemic. (05)

महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई

नियमित / अनियमित बॅच

ऑक्झिलियरी नर्सिंग आणि मिडवायफरी पुरवणी परीक्षा

प्रथम वर्ष

प्राथमिक आरोग्य सेवा परिचर्या—पेपर-३

गुरुवार, दिनांक ६ मार्च २०२५

[**वेळ** : दुपारी १-०० ते दुपारी ४-०० वाजेपर्यंत]

(एकूण गुण—७५)

सूचना.— १. उमेदवाराने तिचा / त्याचा आसन क्रमांक **इंग्रजीमध्ये** लिहावा.

२. **मराठी** पेपरमध्ये कोणत्याही शंका असल्यास **इंग्रजी** आवृत्तीमध्ये सेट केलेली प्रश्नपत्रिका अंतिम आहे.

३. नवीन प्रश्न **नवीन** पानावर सोडविणे.

गुण

१. (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा :— (०५)

(१) त्वचा निळसर होणे यास ..... असे म्हणतात.

(अ) निलांगावस्था (ब) कावीळ

(क) पेटेची (ड) सूज.

(२) शस्त्रक्रियेची जखम ही ..... प्रकारची जखम असते.

(अ) खरचटलेली (ब) चेंगरलेली

(क) कापी/कापलेली (ड) भोसकलेली.

(३) नायट्रोग्लिसरीन गोळी ..... आजाराच्या तातडीच्या उपचारादाखल दिली जाते.

(अ) पक्षाघात (ब) हृदयविकार झटका

(क) मूतखडा (ड) मधुमेह.

(४) दम्याच्या रुग्णास ..... ही स्थिती द्यावी.

(अ) सुपाईन (ब) प्रोन

(क) फाऊलर (ड) लिथोटोमी.

(५) अस्वाभाविक व अपरिपक्व लाल रक्त पेशींच्या होणाऱ्या जास्त निर्मितीस ..... म्हणतात.

(अ) रक्ताक्षय (ब) ल्युकेमिया

(क) ल्युकोपेनिया (ड) थ्रोंबोसायटोपेनिया.

(ब) योग्य जोड्या जुळवा :— (०५)

'अ' गट	**'ब' गट**
(१) कॅल्शियम ऑक्झॅलेट	(अ) इन्सुलिन
(२) मधुमेह	(ब) हायड्रोथेरपी
(३) अतिताप	(क) गलगंड
(४) पी.आर.एन.	(ड) मूतखडा
(५) आयोडीनयुक्त मीठ	(इ) आवश्यकता असल्यास.

[उलटून पहा

गुण

(क) खालील विधाने **चूक** की **बरोबर** ते लिहा :— (०५)

(१) ॲन्टीडोट हा विषाचा परिणाम कमी करण्यासाठी देतात.

(२) बी.सी.जी. लस मलेरियापासून संरक्षण करण्यासाठी देतात.

(३) पित्तरस स्निग्ध पदार्थाच्या पचनासाठी मदत करते.

(४) न्युरॉन हा मूत्रपिंडाचा कार्यक्षम भाग आहे.

(५) नाकातून रक्त वाहणे यास एपिस्टॅक्सीस असे म्हणतात.

२. व्याख्या लिहा :— (१०)

(अ) प्रथमोपचार (ब) साथरोगशास्त्र

(क) जखम (ड) संदर्भसेवा

(इ) गुदमरणे.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— (२०)

(अ) औषधे देताना पाळावयाचे नियम

(ब) प्रतिबंधात्मक स्तर

(क) शीतसाखळी

(ड) कानामध्ये आगंतुक वस्तु-प्रथमोपचार

(इ) उच्च रक्तदाबाची कारणे व काळजी.

४. ५६ वर्षाचे श्री. व्यास मधुमेहाचे रुग्ण आहेत. ते इन्सुलिन इंजेक्शन घेत आहेत. **(१५)**

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) मधुमेहाची व्याख्या लिहा. (०२)

(ब) मधुमेहाची चिन्हे व लक्षणे लिहा. (०४)

(क) मधुमेहाकरिता श्री. व्यास यांचे आहाराचा तक्ता लिहा. (०४)

(ड) श्री. व्यास यांना घरी आरोग्याची काळजी घेण्याविषयी काय आरोग्य सल्ला द्याल? (०५)

किंवा

श्री. राधे ६० वर्षीय पुरुष दर ३-४ दिवसांनी बद्धकोष्ठता व मूळव्याधीचा त्रास असल्याने रुग्णालयात दाखल झाले आहेत. तसेच त्यांना शौचावाटे रक्त पडत आहे. **(१५)**

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) मूळव्याध म्हणजे काय? (०२)

(ब) मूळव्याधीची कारण कोणती? (०३)

(क) मूळव्याधीकरिता कोणकोणत्या तपासण्या केल्या जातात? (०३)

(ड) मूळव्याधीवर कोणती वैद्यकीय व शल्यचिकित्सक उपचार पद्धती असते याविषयी सविस्तर लिहा. (०३)

(इ) श्री. राधे यांच्याकरिता देण्यात येणारी परिचर्या व्यवस्थापन लिहा. (०४)

५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— **(१५)**

(अ) संसर्गजन्य आजार म्हणजे काय? (०२)

(ब) क्रॉस इन्फेक्शन होऊ नये म्हणून काय काळजी घ्याल? (०४)

(क) साथीचे रोग पसरण्याची कारणे कोणती? (०४)

(ड) साथीच्या रोगामध्ये ए.एन.एम.ची भूमिका स्पष्ट करा. (०५)